महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.६५४ (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४११६/२२०२२५९६ Email ID :vanita.shirsat@nic.in

---

क्र.निविआ-४०२५/प्र.क्र.५१२ /का.१४२१ दिनांक : १९.१२.२०२५

## जाहिरात

नियोजन विभाग क्र.सुसंकें-२०२५/प्र.क्र.३२/का.१४१८.,दि.१६.१०.२०२५ अन्वये भू-स्थानिक तंत्रज्ञान (Geospatial Technology) चा वापर करुन प्रशासनात गतिमानता आणणे याकरिता राज्यात “महाजिओटेक महामंडळ” (MahaGeo Tech Corporation) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. “महाजिओटेक महामंडळ” (MahaGeo Tech Corporation) च्या तांत्रिक व कार्यालयीन कामकाजाकरिता १ सेवानिवृत्त कक्ष अधिकारी व १ सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करणेबाबत....

सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०.६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याकरिता सेवानिवृत्त कक्ष अधिकारी व सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवारांनी आपले अर्ज, कक्ष अधिकारी, कार्यासन १४२१, रुम.नं.६५४, विस्तार इमारत, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्याकडे टपालाद्वारे किंवा vanita.shirsat@nic.in या ई-मेलद्वारे किंवा स्वहस्ते सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस सोडून अर्ज सादर करावे.

सेवानिवृत्त कक्ष अधिकारी व सेवानिवृत्त सहायक कक्ष अधिकारी यांनी अर्जासोबत स्वत:चा अलिकडचा पासपोर्ट साईज फोटो, शैक्षणिक अर्हता, प्रमाणपत्रांच्या प्रती, मंत्रालयीन प्रशासकीय विभागात काम केल्याचा अनुभवांचा तपशील व PPO ची छायांकित प्रत यांच्या प्रमाणित प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

**अटी व शर्ती -:**

१. सदर नियुक्ती **केवळ एक वर्षाच्या कालावधीकरिता** करण्यात येणार आहे.
२. उमेदवार राज्य शासनाच्या सेवेतून कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा

४. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५. उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

६. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

७. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

९. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०.६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(वनिता शिरसाट)
कक्ष अधिकारी, नियोजन विभाग

**सोबत अर्जाचा नमूना जोडला आहे.**

# अर्जाचा नमुना

राज्य शासनाच्या कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज.

| पासपोर्ट फोटो |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-...............................................

२) अर्जदाराचा पत्ता :-.......................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-....................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-...............................................

५) जन्म दिनांक व वय :-...........................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) शैक्षणिक अर्हता :-.................................................................

८) अनुभवाचा तपशील :-.................................................................

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य / चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची मला पूर्ण जाणीव आहे.

करार (कंत्राटी) पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशीलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे.

**ठिकाण -:**

**दिनांक -:**

**अर्जदाराची स्वाक्षरी**